भाग "अ"

<table>
<tr><td colspan="2">कर्जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयात<br>(पिठासिन अधिकारी एस.एन. थापेकर)</td></tr>
<tr><td>MHAH220008622018</td><td>दाखल दिनांक – ०३.०८.२०१८<br>नोंदणी दिनांक – ०३.०८.२०१८<br>न्यायनिर्णय दिनांक– १०.०८.२०२६<br>कालावधी – वर्षे महिने दिवस<br>०८ ०० ०७<br>संक्षिप्त फौ. खटला क्र.३३४/२०१८<br>निशाणी – ९ लगत</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td>महाराष्ट्र सरकार तर्फे पो. स्टे. कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर</td></tr>
<tr><td>सरकारी अभियोक्ता</td><td>श्री. डी. आर. बाविस्कर</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>२. मोहन गणपत गांगर्डे,<br>वय – ५१, धंदा– शेती,<br>रा. निमगाव गांगर्डा, ता.कर्जत,<br>जि.अहमदनगर.</td></tr>
<tr><td>आरोपीचे विधीज्ञ</td><td>श्री. एम. यु. नेवसे</td></tr>
</table>

भाग "ब"

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | १०.११.२०१७ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १६.११.२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०३.०८.२०१८ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७.१२.२०१८ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १८.११.२०१९ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०.०८.२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीनावर सोडल्याचा दिनांक | कलम | दोषपुर्ण की दोषमुक्त | शिक्षा लादली |
|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र.२ मोहन गणपत गांगर्डे | २०/०७/२०१८ | २०/०७/२०१८ | मोटार वाहन कायदा कलम १३४ (अ)(ब) सह कलम १७७ प्रमाणे | दोषमुक्त | निरंक |

**भाग "क"**

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**अ. अभियोग पक्ष :–**

| पद | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर) |
|---|---|---|
| सा.क्र.१ | अक्षय अरुण हुलजुते | फिर्यादी |
| सा.क्र.२ | राजाराम तुकाराम गांगर्डे | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.३ | प्रल्हाद काशिनाथ लोखंडे | तपासी अंमलदार |

**ब. बचाव पक्ष :–**

| पद | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार :–

| पद | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच किंवा इतर) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी यांची यादी.</u>

अ. अभियोग पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१३ | फिर्याद |
| २ | नि.क्र.१४ | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | नि.क्र.४२ | इनक्वेस्ट पंचनामा |
| ४ | नि.क्र.५२ | लेखी आदेश |

ब. बचाव पक्ष :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन निशाणी :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**:: न्यायनिर्णय ::**

**( जाहीर दिनांक १०, ऑगस्ट २०२६ )**

प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द मोटार वाहन कायदा कलम १३४ (अ)(ब) सह कलम १७७ अन्वये दंडनिय अपराधाची संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे;</u>**

२. दि.१०.११.२०१७ रोजी रात्री ०७.३० वाजताचे दरम्यान मांदळी गावचे शिवारात हॉटेल सुखसागर जवळ अहमदनगर–सोलापुर हायवे रोडने फिर्यादीचे वडील अरुण बन्सी हुलजुते व त्यांचे मित्र मोहन गणपतराव गांगर्डे टी.व्ही.एस. स्टार मोटार सायकल नोंदणी क्र.एम.एच.१६.ए.यु.१३६९ वरुन घोगरगाव गावाकडे घरी जात असताना त्यांच्या मोटार सायकलला पाठीमागून पिकअप टेम्पो वरील अज्ञात चालकाने त्याच्या ताब्यातील टेम्पो रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व अविचाराने भरधाव वेगात चालवून मोटार सायकलला पाठीमागून जोराची धडक देऊन अपघात करुन फिर्यादीच्या वडीलांच्या मृत्युस, मोहन गांगर्डे यांचे कमी अधिक दुखापतीस व मोटार सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला आणि अपघाताची खबर न देता निघुन गेला.

३. तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, कर्जत, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथे गुन्हा क्र.३०३/२०१७ मोटार वाहन कायदा कलम १३४ (अ)(ब) सह कलम १७७ अन्वये दाखल करण्यात आला. श्री. पी. के. लोखंडे, पो.हे.कॉ. ब.नं.१७४८ यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ पंचनामा केला व तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. ज्या वाहनाने फिर्यादीचे वडील व आरोपी क्र.२ जात असलेल्या मोटार सायकलला धडक दिली त्या वाहनाचा चालक म्हणजे आरोपी क्र.१ सोमनाथ ग्यानदेव साळुंके याच्या विरुध्द दि.०१/०७/२०२० रोजी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर त्याच्या विरुध्द संपरीक्षा देखील चालविण्यात आली. सदर आरोपी क्र.१ विरुध्द भा. दं. वि. कलम. २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४(अ)(ब) सह कलम १७७ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला होता. दरम्यान प्रस्तुत खटला प्रलंबित असताना आरोपी क्र.१ मयत झाला. त्यामुळे नि.क्र.१ लगत दि.१३.०२.२०२६ रोजी करण्यात आलेल्या आदेशानुसार त्याच्या विरुध्द खटला अपशमित (Abate) झाला. त्यामुळे सदर खटला सद्यस्थितीत केवळ आरोपी क्र.२ याचे विरुध्दच्या दोषारोपाच्या अनुषंगाने चालविण्यात आला.

५. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द मोटार वाहन कायदा कलम १३४(अ)(ब) सह कलम १७७ नुसार दंडनिय अपराधाचा तपशिल (नि.क्र.९) वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व संपरीक्षेची मागणी केली. अभियोगपक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. आरोपी विरुध्द गुन्ह्यादर्शक पुरावा अभिलेखावर आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन (नि.क्र.९ लगत) नोंदविण्यात

आले. आरोपीचा संपुर्ण बचाव हा नकारात्मक असुन त्यास खोट्या गुन्ह्यात गोवले असा आहे.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांचा व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. यु. नेवसे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. न्यायनिर्णयाकामी माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपीने दिनांक १०/११/२०१७ रोजी रात्री ०७:३० वाजता अहमदनगर–सोलापूर रोडवर, हॉटेल सुखसागर जवळ, मांदळी गावाच्या हद्दीत, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे झालेल्या अपघाताबाबत पोलीस अधिकाऱ्यास कोणतीही माहिती न देता व जखमीस वैद्यकीय मदत करता पळुन गेला व मोटर वाहन कायदा कलम १३४(अ)(ब) सह कलम १७७ अन्वये गुन्हा केला ? | .. नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता :–**

८. आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयातीत रितीने शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. अभियोगपक्षाचे पुराव्यावरुन दिसून येते की, प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्दचा दोषारोप शाबीतीसाठी अभियोगपक्षाने अभिलेखावर दाखल केलेला पुरावा हा परिस्थितीजन्य स्वरुपाचा आहे. त्यामुळे

सदर परिस्थितीजन्य पुरावा आरोपीचा दोषारोप संशयातीतरितीने शाबीत करण्यासाठी पुरेसा आहे का ते पाहणे गरजेचे आहे.

९. अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.१ अक्षय अरुण हुलजुते हा स्वतः तक्रारदार असून त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, तो मोहन गणपत गांगर्डे यांना ओळखतो. ते त्याच्या वडिलांचे मित्र होते. घटना दोन वर्षांपूर्वी मांदळी येथे नगर–सोलापूर रोडवर सायंकाळी सात ते आठ वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी त्याचे वडील व आरोपी मोहन मोटरसायकलवर घोगरगाव येथून निमगावकडे नगर–सोलापूर रोडने येत होते. त्याला वडिलांचा अपघात झाल्याबाबत घरी फोन आला होता. त्यावरून तो व आई त्याठिकाणी जात असताना मोहन गांगर्डे त्यांना रस्त्यात भेटले. त्यांना अपघात झाला आहे का असे विचारले असता त्यांनी हो असे सांगितले. त्यांना कुठे जात आहे असे विचारले असता त्यांनी तुम्हालाच सांगण्याकरिता जात आहे असे सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या मोटरसायकलला पिकअप गाडीने धडक दिली व वडिलांना मिरजगाव येथील कोरडे दवाखान्यात भरती केले आहे. त्यानंतर त्याने त्याच्या आईला घरी पाठवले व त्यांच्यासोबत दवाखान्यात गेला. दवाखान्यात बघितले असता वडील दिसून आले नाहीत. मिरजगाव येथील सर्व दवाखाने तपासले, परंतु त्याचे वडील मिळून आले नाहीत. त्यानंतर त्याने त्याच्या नातेवाईकांना फोन केला व रात्रभर त्यांना टेंभुर्णीपर्यंत शोधले, ते मिळून न आल्याने पोलीस स्टेशन येथे खबर दिली. दुसऱ्या दिवशी ते कर्जत रोडच्या फाट्यावर सापडले व त्यांच्या डोक्याला मार लागला होता. तो त्याच्या वडीलांना नगर येथे सिव्हील हॉस्पिटलमध्ये घेउन गेला. त्यांनी पुणे येथे ससून हॉस्पिटल येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर तो त्याच्या वडीलांना ससून हॉस्पिटल, पुणे येथे नेले व उपचार केला. उपचार सुरू असताना त्याचे वडील मरण पावले. त्यानंतर त्याने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

१०. पुढे त्याने असे कथन केले की, त्याने पोलीस स्टेशन येथे घटनेबाबत फिर्याद दिल्यानंतर पोलीस त्याच्याकडे आले होते व त्याचा पुरवणी जबाब नोंदवला होता. ज्या गाडीने त्याच्या वडिलांच्या गाडीला धडक दिली, त्या गाडीचा क्र.एम.एच.१६.सी.सी.०३७५ असा असल्याचे त्याला माहित झाल्याने त्याने तो क्रमांक पोलिसांना त्याच्या पुरवणी जबाबात सांगितला होता. ती पिकअप गाडी असल्याचेसुध्दा त्याने पोलिसांना सांगितले होते. ती पिकअप गाडी सोमनाथ साळुंखे नावाचा इसम चालवत असल्याचे त्याला माहित झाले होते. ती पिकअप गाडी अस्लम शेख रा. मिरजगाव याच्या मालकीची असल्याचेसुध्दा त्याला माहित झाले होते. पोलिसांनी त्याला सोमनाथ साळुंखे याला दाखवले होते.

११. आरोपीच्या वतीने विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे यांनी फिर्यादीचा उलटतपास घेतला. उलटतपासामध्ये फिर्यादीने कबूल केले की, घटनास्थळ त्याच्या गावापासून ३-४ कि.मी. अंतरावर आहे. सदर घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. त्याने अपघाताच्या वेळी त्याचे वडील कोणत्या मोटार सायकलवरुन जात होते हे बघितले नव्हते.

१२. अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला साक्षीदार क्र. २ राजाराम तुकाराम गांगर्डे हा घटनास्थळ पंच असून असून त्याच्या कथनानुसार दि. १७/११/२०१७ रोजी पोलीसांनी त्याला मांदळी येथे सुखसागर हॉटेलजवळ पंचनाम्याकरीता बोलविले होते. त्यावेळी त्याच्यासोबत राजेंद्र बन्सी हुलचुते हे होते. त्यांना घटनास्थळ अक्षय अरूण हुलचुते याने दाखवले होते. त्याठिकाणी मोटरसायकलच्या इंडिकेटरच्या काचा पडलेल्या दिसल्या. त्यानंतर पोलिसांनी पंचनाम्यावर त्यांच्या सहया घेतल्या होत्या.

१३. आरोपीच्या वतीने विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. उलटतपासात सदर साक्षीदाराने कबूल केले की, पोलीसांनी अगोदरच पंचनामा लिहून ठेवलेला होता. त्याने केवळ त्यावर सही केली होती.

१४. अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.३ तपासी अंमलदार प्रल्हाद काशिनाथ लोखंडे यांच्या कथनानुसार ते सन २०१६ ते सन २०२१ पर्यंत पोलीस स्टेशन, कर्जत येथे पोलीस हेड हवालदार या पदावर कार्यरत होते. ठाणेदार यांच्या लेखी आदेशान्वये त्यांना अपराध क्र. ३०३/२०१७, भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ आणि ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ) (ब) सह कलम १७७ ची केस डायरी तपासकामी मिळाली होती. सदरच्या केस डायरीसोबत त्यांना रिपोर्ट, गुन्हा घडल्याचा प्राथमिक अहवाल, दै. अहवाल आणि यादी मिळाले होते. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. दि.१७/११/२०१७ रोजी त्यांनी कथित घटनास्थळी जाउन फिर्यादीने दाखवल्याप्रमाणे दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. त्यानंतर मयत अरुण बन्सी हुलचुते याचे वैद्यकिय कागदपत्रे तसेच मरणोत्तर पंचनामा पुणे येथील दवाखान्यातुन मागवुन घेतले होते. आरोपी क्र.२ मोहन याने कथित घटनेबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली नव्हती. त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी क्र.१ सोमनाथ याने कथित अपघात केलेला आहे त्यामुळे मयत अरुण याचा मृत्यु झालेला आहे. त्यानंतर तपासाअंती न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

१५. आरोपीच्या वतीने विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. उलटतपासात सदर साक्षीदाराने कबुल केले की, सदर घटनेत नमुद केलेला अपघात आरोपी मोहन याने केलेला नाही.

१६. सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांनी अभियोगपक्षाच्या वतीने तोंडी युक्तीवाद केला. त्यांच्या युक्तीवादानुसार फिर्यादीचा व तपासी अधिकारी यांचा आरोपीचा गुन्ह्याशी संबंध दर्शविणारा पुरावा सुसंगत आहे. फिर्यादीचे वडील मयत झालेले होते. त्यामुळे फिर्याद देण्यास उशीर झाला. त्यामुळे विलंबाचे संयुक्तीक स्पष्टीकरण वादपटलावर आलेले आहे. केवळ विलंब झाला या कारणावरुन फिर्यादीचा तोंडी पुरावा नाकारता येणार नाही. सदर साक्षीदारांना आरोपीस खोट्या गुन्हयात गोवण्यास कोणतेही कारण नाही. घटनास्थळ पंचनामा देखील शाबीत झालेला आहे. सदर साक्षीदारांच्या पुराव्यात कोणतीही महत्वपूर्ण विसंगती नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपी विरुध्दचा दोषारोप संशयातीत रितीने शाबीत केलेला आहे.

१७. आरोपी क्र.२ च्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी घटनेबाबत केलेले कथन सत्य आहे असे समजले तरी सदर आरोपीने जाणुनबूजुन पोलीसांना घटनेची माहिती दिली नाही. अथवा जखमीस वैद्यकीय सहाय्य पुरविले नाही असे दिसत नाही. तसेच फिर्यादीचा तोंडी पुरवा व खबरी जबाब यात महत्वपुर्ण विसंगती आहे. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा हा संशयातीत नाही. एकंदरीत अभियोगपक्ष आरोपीचा सदर घटनेतील सहभाग शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

१८. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. मयताचा इनक्वेस्ट पंचनामा आणि फिर्यादीचा तोंडी पुरावा यावरुन त्याचे वडील अरुण बन्सी हुलजुते यांचा अपघाती मृत्यु झाला हे निश्चित होते. फिर्यादीच्या कथनानुसार घटनेच्या वेळी त्याचे वडील आरोपी क्र.२ मोहन गांगर्डे याच्या मोटार सायकलवरुन जात असताना त्यांच्या मोटार सायकलला आरोपी

क्र.१ चालवत असलेल्या वाहनाने धडक दिली व त्यानंतर सदर आरोपीने त्याच्या वडीलांना वैद्यकीय सहाय्य केले नाही. त्याने त्याचे वडील कोरडे हॉस्पीटल येथे दाखल असल्याचे सांगितले. तथापि, त्यावेळी त्याचे वडील दवाखान्यात नव्हते. त्याचे वडील दोन दिवसानंतर रस्त्याच्या कडेला मिळून आले होते. सदर साक्षीदाराच्या फिर्याद नि.क्र.१३ मध्ये केलेल्या मजकुरावरुन दिसून येते की, त्याने व त्याच्या नातेवाईकांनी कोरडे हॉस्पीटल येथे चौकशी केली त्यावेळी त्याचे वडील तेथे नव्हते. त्याने दुसऱ्या दिवशी चौकशी केली त्यावेळी त्याचे वडील सरकारी दवाखाना, मिरजगाव येथे दाखल असल्याचे समजले. एकंदरीत त्याच्या वडीलांना घटनेनंतर वैद्यकीय सहाय्य मिळाले नाही याबाबत सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात व खबरी जबाब नि.क्र.१३ मध्ये केलेले कथन यात विसंगती आहे. सदर विसंगती आरोपी विरुध्दच्या दोषारोपाच्या अनुषंगाने महत्वपुर्ण आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराचा आरोपी विरुध्दच्या दोषारोपाच्या अनुषंगाने असलेले कथन हे संशयातीत नाही हे स्पष्ट होते.

१९. वरील विवेचनावरुन फिर्यादीच्या वडीलांचे अपघाती निधन झालेले आहे तरी घटनेनंतर सदर आरोपीने फिर्यादीच्या वडीलांना वैद्यकीय सहाय्य पुरविले किंवा कसे व त्याची माहिती पोलीसांना दिली नाही. याबाबतचा अभियोगपक्षाचा पुरावा संशयातीत नाही हे स्पष्ट होते. सबब, फिर्यादीच्या वडीलांना अपघातात झालेल्या दुखापतीनंतर आरोपीने त्याच्या वडीलांना वैद्यकीय सहाय्य न पुरवता तो तेथून मदत न करता पळून गेला व तसेच, झालेल्या अपघाताची खबर पोलीस ठाण्यास दिली नाही हे कथन अभियोगपक्ष संशयातीत रितीने शाबीत करु शकलेला नाही असे मत मी नोंदवित आहे. सदर संशयाचा फायदा आरोपीस होईल. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थ नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.२ मोहन गणपत गांगर्डे याची मोटार वाहन कायदा कलम १३४(अ)(ब) सह कलम १७७ प्रमाणेच्या दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका बंधपत्र व जमानतीचा बंधपत्र रद्द करण्यात आले. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– (अक्षरी पंधरा हजार मात्र) चा सहा महिन्याच्या कालावधीकरीता वैयक्तिक जातमुचलका द्यावा. |

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.08.12 18:39:54 +0530

दिनांक : १०.०८.२०२६.
ठिकाण : कर्जत.

**( एस. एन. थापेकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम
वर्ग, न्यायालय क्र.१, कर्जत

<u>**प्रमाणपत्र**</u>

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | **श्री. एस. एन. थापेकर**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्र.१, कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | **वैभव गो. घोगरे**<br>लघुलेखक (श्रेणी–३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १०/०८/२०२६ |